# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : CA/2332

दिनांक : 18/06/2015

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित बी.एड./एम.एड. शिक्षणशास्त्र महाविद्यालय.

**विषयः– बी.एड./एम.एड. प्रथम वर्ष अभ्यासक्रम वर्ष २०१५–१६ च्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत अध्यापक महाविद्यालयांच्या नोंदणीबाबत.**

**संदर्भः– शासन पत्र क्र. १) उशिसं/बी.एड. नोंदणी/२०१५–१६/बी.एड., दिनांक. ११.०६.२०१५.**
**२) उशिसं/एम.एड. नोंदणी/२०१५–१६/एम.एड., दिनांक. ११.०६.२०१५.**

महोदय/महोदया,

उपरोक्त शासन पत्रामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१५–१६ च्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत बी.एड./एम.एड. अध्यापक महाविद्यालयांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याबाबतची प्रक्रिया सदर पत्रामध्ये स्पष्ट केलेली आहे. सोबत वरील दोनही शासनाची पत्रे जोडलेली असून त्यामध्ये दिलेले आदेश/सूचना स्वयंस्पष्ट आहेत. कृपया त्याप्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.म.)

**सोबतः वरीलप्रमाणे.**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्रमांक उशिसं/बी.एड.नोदणी/२०१५-१६/बी.एड दिनांक ११.०६.२०१५

**अतितात्काळ**

प्रति,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/अशासकीय
कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**विषय : बी.एड अभ्यासक्रम प्रथम वर्ष २०१५-१६ च्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत अध्यापक महाविद्यालयांच्या नोंदणीबाबत.**

शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे द्वारे २०१५-१६ ची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होत आहे. या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी अध्यापक महाविद्यालयांनी नोंदणी दिनांक १६.०६.२०१५ ते ३०.०६.२०१५ पर्यंत करावयाची आहे. नोंदणी करणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. मान्यता, एनसीटीई अधिसूचना २०१४ प्रमाणे एनसीटीईला सादर केलेले प्रतिज्ञापत्र, शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच विद्यापीठाचे २०१५-१६ व २०१६-१७ साठीचे संलग्निकरण किंवा युनिटसह बी.एड प्रथम वर्षाला प्रवेश देण्याबाबत शिफारस पत्र. (युनिटच्या बाबतीत एका संस्थेला एनसीटीई रेग्युलेशन २०१४ नुसार कमाल दोन युनिट दर्शविता येतील.) शासकीय / अनुदानित महाविद्यालयांबाबत माध्यम निहाय एकच युनिट धरुन माहिती भरावी. वर्ष २०१५-१६, २०१६-१७ साठीचे संलग्निकरण किंवा वर्ष २०१५-१६ साठीच्या युनिट संख्येसह प्रवेशासाठी विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. यासाठी आवश्यक ती माहिती सर्व शासकीय, अनुदानित व अल्पसंख्याक अनुदानित अध्यापक महाविद्यालये तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या विना अनुदानित व अल्पसंख्यांक विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांनी या पत्रा सोबत दिलेली माहिती आपल्या लॉग-ईन ऑयडी मध्ये दिनांक १६.०६.२०१५ ते ३०.०६.२०१५ दरम्यान भरावयाची आहे. **अल्पसंख्यांक महाविद्यालयाने ५० टक्के अल्पसंख्यांक कोटा किंवा कोटयाच्या काही जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेला समर्पित करणार असेल तर त्याबाबत अल्पसंख्यांक आयोगाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक**

**आहे. जी विनाअनुदानित अल्पसंख्यांक व विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालये सहभागी होऊ इच्छितात त्यांनी तुकडयानिहाय/एन.सी.टी.ई रेग्युलेशन २०१४ अन्वये तुकडया / युनिट जे जास्त असतील त्या निहाय शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा रु. १०००/- चा डी.डी. भरुन सभासदत्व घ्यावे** व नोंदणी करावी. जी विनाअनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालये ५१ टक्के अल्पसंख्यांक कोटा किंवा कोटयाच्या काही जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेला समर्पित करणार असेल तर त्याबाबत अल्पसंख्यांक आयोगाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सोबतच्या तक्त्यातील माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. पुणे यांच्या संकेतस्थळावर http://bed.mhpravesh.in दिनांक ३०.०६.२०१५ पूर्वी भरण्यात यावी. आपण आपली माहिती ऑन लाईन अचूक भरावी. **माहितीसोबत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा भरावयाच्या जागांचे विषयनिहाय व संवर्गनिहाय अचूक विभाजन द्यावयाचे आहे.** विषयनिहाय व संवर्गनिहाय विभाजनाची व्यवस्था एम.के.सी.एल. च्या सॉफ्टवेअरमध्ये केलेली आहे. त्यामुळे नोंदणीसोबत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा भरावयाच्या जागांचे विषयनिहाय व संवर्गनिहाय विभाजन प्राप्त करुन घ्यावे.

**आपल्याला विदित आहे की, केंद्रीय बी.एड. प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन राबविली जात आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून एकदाच ऑप्शन फॉर्म भरले जातात त्यामुळे प्रक्रियेत सुरवातीला ज्या महाविद्यालयांची नोंदणी होईल तीच महाविद्यालये ऑप्शनसाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. उमेदवारांनी ऑप्शन फॉर्म भरल्यानंतर आपण नोंदणी केली तर आपल्या महाविद्यालयाला ज्या उमेदवाराने रिजन किंवा जिल्हा ऑप्शन दिलेला असेल अशांनाच त्या विभागातील किंवा जिल्ह्यातील अध्यापक महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश दिला जातो. अशा वेळी अलॉटमेंट झालेले विद्यार्थी रूजू होतीलच असे नाही. त्यामुळे अध्यापक महाविद्यालयाच्या जागा भरण्यावर परिणाम होतो व जागा रिक्त राहण्याची शक्यता असते. ही बाब टाळण्यासाठी उमेदवाराने ऑप्शन फॉर्म भरण्यापूर्वी महाविद्यालयाची नोंदणी होणे अत्यावश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

ऑन लाईन नोंदणी केल्यानंतर डी.डी. सह ऑनलाईन केलेली नोंदणी पत्र तसेच त्यासोबत भरलेल्या माहिती व भरावयाच्या जागेच्या विभाजनाची हार्ड कॉपी तसेच आवश्यक कागदपत्रे (एन.सी.टी.ई. मान्यता, शासन मान्यता, विद्यापीठाचे संलग्निकरण २०१५-१६ व २०१६-१७ व एनसीटीई युनिट मान्यतेचे पत्र, एनसीटीईला सादर केलेले प्रतिज्ञापत्र, बी.एड प्रथम वर्षाला विद्यार्थी प्रवेशित

करण्यासाठी विद्यापीठाचे शिफारसपत्र) शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, बी.एड./एम.एड प्रवेश विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ येथे तात्काळ खास दूताकरवी किंवा स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात यावी. ज्या अध्यापक महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त झालेले नाही त्यांनी विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील आशयाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

"प्रमाणित करण्यांत येते की, ---------------------------------------------------------- या अध्यापक महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ साठी संलग्नीकरण देण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयात ---------- युनिट असून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी ------- युनिट महाविद्यालयात बी.एड प्रथम वर्ष विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे."

**केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत एकदा नोंदणी केल्यानंतर विद्यार्थी प्रवेशित होण्यापूर्वी संबंधित अध्यापक महाविद्यालयाला नोंदणी रद्द करावयाची असल्यास भरलेले शुल्क परत केले जाणार नाही. विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील नोंदणी कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

**एन.सी.टी.ई.ने जर एखाद्या अध्यापक महाविद्यालयाची मान्यता काढून घेतली असेल किंवा संस्थेला मान्यता काढून का घेऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असेल व यासंदर्भात संस्थेने अपील दाखल केले असेले तरी त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती, एन.सी.टी.ई.च्या आदेशासह प्रस्तावासोबत सादर करणे संबंधित महाविद्यालयावर बंधनकारक राहील. ही माहिती उघड न करता महाविद्यालयाची नोंदणी केल्याचे नंतर निदर्शनास आल्यास अशा महाविद्यालयांची नोंदणी त्याच क्षणी रद्द करण्यांत येईल. तसेच जर विद्यार्थी प्रवेशित झालेले असतील तर या संबंधित सर्व कायदेशीर बाबीस महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी व अशी कारवाई करण्याची वेळ येऊ नये यासाठी योग्य ती दक्षता सुरुवातीलाच घ्यावी.**

अनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी भरावयाच्या ५० टक्के जागा दिनांक १६ फेब्रूवारी २००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील वर्ष २०१५-१६ च्या सीईटी उत्तीर्ण पात्र उमेदवारातूनच बी.एड प्रवेश नियमाचे पालन करुन संबंधित अल्पसंख्यांक उमेदवारांमधूनच गुणवत्तेनुसार भरणे अनिवार्य राहील. प्रवेशित उमेदवारांना संबंधित महाविद्यालयाने

त्यांच्या Login ID मधून प्रवेश पत्र काढून देणे आवश्यक राहील. अल्पसंख्यांक कोटयांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील. प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास शासनाच्या परवानगीने केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अध्यापक महाविद्यालयाला असोसिएशन सीईटी उत्तीर्ण व असोसिएशनच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची सीईटी उत्तीर्ण ज्यांना कोठेही प्रवेश मिळाला नाही असे उमेदवार घेता येतील.

अल्पसंख्यांक कोटयांतर्गत पुरेशा जागा संस्थेला उपलब्ध न झाल्यास अथवा संस्था अल्पसंख्यांक कोटा घेऊ इच्छित नसल्यास त्या जागा संस्थेला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे अल्पसंख्यांक आयोगाच्या परवानगीने समर्पित करता येतील.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोटा केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (Govt. CAP) अथवा महाराष्ट्र विनाअनुदान अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन (Asso. CAP) यापैकी एकाच (CAP) मधून जागा भरता येतील. दोन्ही (CAP) मधून एकत्रित जागा भरता येणार नाहीत. तथापी प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर एका (CAP) मध्ये जागा रिक्त असेल तर व दुस-या (CAP) मध्ये उमेदवार उपलब्ध असेल तर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या किंवा शासनाच्या परवानगीने त्या दुस-या (CAP) मधुन जागा भरता येतील. ज्या विनाअनुदानित / कायम विना अनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमधून (CAP) अल्पसंख्यांक कोटा भरला आहे त्यांना Login ID मधून प्रवेश पत्र काढून देणे आवश्यक राहील. तसेच अल्पसंख्यांक कोटयांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा. प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने महाराष्ट्र विना अनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनमार्फत कोटा भरला असेल तर अल्पसंख्यांक कोटयांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी महाराष्ट्र विना अनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन तसेच प्रवेश नियंत्रण समितीकडून मान्य करुन घेणे अनिवार्य राहील.

अल्पसंख्यांक कोटयांतर्गत पुरेशा जागा संस्थेला उपलब्ध न झाल्यास अथवा संस्था अल्पसंख्यांक कोटा घेऊ इच्छित नसल्यास त्या जागा संस्थेला अल्पसंख्यांक आयोगाच्या परवानगीने केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे समर्पित करता येतील.

बी.एड प्रवेश प्रक्रिया २०१५ ऑनलाईन महाविद्यालय नोंदणी पध्दत सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे नोदणी करावी.

**लक्षवेध :** शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये सीईटी न दिलेल्या उमेदवारांना प्रवेश देता येणार नाही.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०५१७२९ वर संपर्क साधावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत :

१. श्री.मोहन ठोंबरे, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. सन २०१५-१६ या वर्षी सुरु होणाऱ्या बी.एड. प्रवेश प्रक्रियेसंबंधीचे वरील प्रारुप वेबसाईटवर टाकण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. आपल्या विभागातील सर्व अध्यापक महाविद्यालयांना सदरच्या सूचना त्वरित वितरित करण्यात याव्यात.

३. सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व अध्यापक महाविद्यालयांना सदरच्या सूचना त्वरित वितरित करण्यात याव्यात.

# शासनाच्या केंद्रीय बी.एड (प्रथम वर्ष) प्रवेश प्रक्रियेत (२०१५-१६) सहभागी होण्यासाठी संबंधित अध्यापक महाविद्यालयाने भरुन द्यावयाचा तक्ता

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी. | महाविद्यालयाचे प्राचार्यांचे संपूर्ण नांव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | संपर्क व्यक्ती / संगणक तज्ञ व्यक्तिचा दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | संस्थेचा संपूर्ण नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक | संस्थेच्या संपर्क व्यक्तिचे नांव, पद, पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

| एन.सी.टी.ई. मान्यता आदेश क्रमांक व दिनांक (प्रत जोडावी) | शासनाची परवानगी आदेश क्रमांक व दिनांक (प्रत जोडावी) | विद्यापीठ संलग्निकरण आदेश क्रमांक व दिनांक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ साठी (नसल्यास विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील टिप २ प्रमाणे प्रमाणपत्र जोडावे) (प्रत जोडावी) | वर्ष २०१५-१६ साठीचे संलग्निकरण नसल्यास यापूर्वी संलग्निकरण मिळालेले वर्ष व दिनांक (प्रत जोडावी) | महाविद्यालय शासकीय / अनुदानित / अल्पसंख्यांक विना अनुदानित / विना अनुदानित अल्पसंख्यांक (जर अल्पसंख्यांक असेल तर प्रकार धार्मिक, भाषिक व यापैकी कोणता) | नॅकद्वारा मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | |

| मुलांचे / मुलींचे / मुला-मुलींचे | प्रवेश क्षमता (माध्यम निहाय) | | अल्पसंख्यांक संस्था अल्पसंख्यांक अनुदानित ५० टक्के, विनाअनुदानित ५१ टक्के अंतर्गत भरत असलेल्या जागा | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून एकूण भरावयाच्या जागा |
|---|---|---|---|---|
| | युनिट | माध्यम | | |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | |

| शैक्षणिक शुल्क (विना अनुदानित असल्यास) शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले (शासकीय / अनुदानित संस्थेने लिहू नये) | विद्यापीठाने निर्धारीत केलेले इतर शुल्क | शासन मान्य इतर शुल्क | महाविद्यालयात असलेल्या अध्यापन पध्दती | वसतीगृहाची सोय असल्यास प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | |

| वसतीगृहाची सोय असल्यास मुलांचे / मुलींचे / दोन्हीची | वसतीगृहात राहण्याचा मासिक / वार्षिक दर | वसतीगृह भोजनाची सोय असल्यास मासिक / वार्षिक दर | विना अनुदानित साठी नांव नोंदणी शुल्काचे विवरण (डी.डी. काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचे नांव, डी.डी.नंबर व दिनांक रक्कम रु.१०००/-) **(तुकडी निहाय शुल्क भरावे)** |
|---|---|---|---|
| २३ | २४ | २५ | २६ |
| | | | |

**टिप :** १. रकाना क्रमांक ७, ८, ९ व १० बाबत संबंधित आदेशांच्या प्रमाणित प्रती तसेच एनसीटीई अधिसूचना २०१४ प्रमाणे सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर कराव्यांत.

२.''प्रमाणित करण्यांत येते की, ------------------------------------------------------ या अध्यापक महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी संलग्नीकरण देण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयाची ---------- युनिट असून शैक्षणिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ साठी महाविद्यलया ------ युनिट साठी बी.एड प्रथम वर्षाला विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे.'' अशा आशयाचे विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडावे.

३. रकाना क्रमांक २२ मध्ये जर कृषिशास्त्र / माहिती तंत्रज्ञान / संगणक / अभियांत्रिकी / समाजशास्त्र या अध्यापन पध्दती नसतील तर त्यांचा समावेश करु नये. या अध्यापन पध्दतीचे उमेदवार नियमाप्रमाणे प्रवेशित करण्यांत येतील.

प्राचार्यांची स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in
E-mail : dhepune@yahoo.co.in,
For B.Ed.:beddhepune@gmail.com

फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६०५१७२९


क्रमांक उशिसं/एम.एड.नोदणी/२०१५-१६/बी.एड दिनांक ११.०६.२०१५

**अतितात्काळ**

प्रति,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/अशासकीय
कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**विषय : एम.एड प्रथम वर्ष अभ्यासक्रम वर्ष २०१५-१६ च्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत अध्यापक महाविद्यालयांच्या नोंदणीबाबत.**

शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे द्वारे २०१५-१६ ची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होत आहे. या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी एम.एड अध्यापक महाविद्यालयांनी नोंदणी दिनांक १६.०६.२०१५ पासून ३०.०६.२०१५ पर्यंत करावयाची आहे. नोंदणी करणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. मान्यता, एनसीटीई अधिसूचना २०१४ प्रमाणे एनसीटीईला सादर केलेले प्रतिज्ञापत्र, शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच विद्यापीठाचे २०१५-१६ व २०१६-१७ साठीचे संलग्निकरण किंवा युनिटसह एम.एड प्रथम वर्षाला प्रवेश देण्याबाबत शिफारस पत्र (युनिटच्या बाबतीत एका संस्थेला एनसीटीई रेग्युलेशन २०१४ नुसार कमाल दोन युनिट दर्शविता येतील.) वर्ष २०१५-१६, २०१६-१७ साठीचे संलग्निकरण किंवा वर्ष २०१५-१६ साठीच्या युनिट संख्येसह प्रवेशासाठी विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. यासाठी विद्यापीठातील अनुदानित युनिट, विनाअनुदानित युनिट, शासकीय स्वयंसहाय्यित एम.एड अध्यापक महाविद्यालये तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या विना अनुदानित व अल्पसंख्यांक विनाअनुदानित एम.एड अध्यापक महाविद्यालयांनी या पत्रा सोबत दिलेली माहिती आपल्या लॉग-ईन ऑयडी मध्ये दिनांक १६.०६.२०१५ पासून ३०.०६.२०१५ दरम्यान भरावयाची आहे. **अल्पसंख्यांक महाविद्यालयाने ५१ टक्के अल्पसंख्यांक कोटा संस्था भरणार आहे किंवा केंद्रीय**

**प्रवेश प्रक्रियेला समर्पित करणार असेल तर त्याबाबत अल्पसंख्यांक आयोगाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जी विनाअनुदानित अल्पसंख्यांक व विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालये सहभागी होऊ इच्छितात त्यांनी तुकडयानिहाय /एन सी टी ई रेग्युलेशन २०१४ नुसार युनिट निहाय शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा रु. १०००/- चा डी.डी. भरुन सभासदत्व घ्यावे** व नोंदणी करावी. तसेच सोबतच्या तक्त्यातील माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. पुणे यांच्या संकेतस्थळावर http://med.mhpravesh.in दिनांक ३०.०६.२०१५ पूर्वी भरण्यात यावी. आपण आपली माहिती ऑन लाईन अचूक भरावी. **माहितीसोबत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा भरावयाच्या जागांचे संवर्गनिहाय अचूक विभाजन द्यावयाचे आहे.** संवर्गनिहाय विभाजनाची व्यवस्था एम.के.सी.एल. च्या सॉफ्टवेअरमध्ये केलेली आहे. त्यामुळे नोंदणीसोबत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा भरावयाच्या जागांचे संवर्गनिहाय विभाजन प्राप्त करुन घ्यावे.

**आपल्याला विदित आहे की, केंद्रीय एम.एड. प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन राबविली जात आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून एकदाच ऑप्शन फॉर्म भरले जातात त्यामुळे प्रक्रियेत सुरवातीला ज्या महाविद्यालयांची नोंदणी होईल तीच महाविद्यालये ऑप्शनसाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. उमेदवारांनी ऑप्शन फॉर्म भरल्यानंतर आपण नोंदणी केली तर आपल्या महाविद्यालयाला ज्या उमेदवाराने विभाग किंवा जिल्हा ऑप्शन दिलेला असेल अशांनाच त्या विभागातील किंवा जिल्ह्यातील अध्यापक महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश दिला जातो. अशा वेळी अलॉटमेंट झालेले विद्यार्थ्यी रूजू होतीलच असे नाही. त्यामुळे अध्यापक महाविद्यालयाच्या जागा भरण्यावर परिणाम होतो व जागा रिक्त राहण्याची शक्यता असते. ही बाब टाळण्यासाठी उमेदवाराने ऑप्शन फॉर्म भरण्यापूर्वी महाविद्यालयाची नोंदणी होणे अत्यावश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

ऑन लाईन नोंदणी केल्यानंतर डी.डी. सह ऑनलाईन केलेली नोंदणी पत्र तसेच त्यासोबत भरलेल्या माहिती व भरावयाच्या जागेच्या विभाजनाची हार्ड कॉपी तसेच आवश्यक कागदपत्रे (एन.सी.टी.ई. मान्यता, शासन मान्यता, विद्यापीठाचे संलग्निकरण २०१५-१६ व २०१६-१७ व एनसीटीई युनिट मान्यतेचे पत्र, एनसीटीईला सादर केलेले प्रतिज्ञापत्र, एम.एड प्रथम वर्षाला विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाचे शिफारसपत्र) शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, बी.एड./एम.एड प्रवेश विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ येथे तात्काळ खास दूताकरवी किंवा स्पीड पोस्टद्वारे

पाठविण्यात यावी. ज्या अध्यापक महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त झालेले नाही त्यांनी विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील आशयाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

"प्रमाणित करण्यांत येते की, --------------------------------------------------- या अध्यापक महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ साठी संलग्नीकरण देण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयात ---------- युनिट असून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी ------- युनिट महाविद्यालयात एम.एड प्रथम वर्ष विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे."

**केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत एकदा नोंदणी केल्यानंतर विद्यार्थी प्रवेशित होण्यापूर्वी ती संबंधित अध्यापक महाविद्यालयाला नंतर रद्द करावयाची असल्यास भरलेले शुल्क परत केले जाणार नाही. विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयाला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील नोंदणी कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

**एन.सी.टी.ई.ने जर एखाद्या अध्यापक महाविद्यालयाची मान्यता काढून घेतली असेल किंवा संस्थेला मान्यता काढून का घेऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असेल व यासंदर्भात संस्थेने अपील दाखल केले असेले तरी त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती, एन.सी.टी.ई.च्या आदेशासह प्रस्तावासोबत सादर करणे संबंधित महाविद्यालयावर बंधनकारक राहील. ही माहिती उघड न करता महाविद्यालयाची नोंदणी केल्याचे नंतर निदर्शनास आल्यास अशा महाविद्यालयांची नोंदणी त्याच क्षणी रद्द करण्यांत येईल. तसेच जर विद्यार्थी प्रवेशित झालेले असतील तर या संबंधित सर्व कायदेशीर बाबीस महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी व अशी कारवाई करण्याची वेळ येऊ नये यासाठी योग्य ती दक्षता सुरुवातीलाच घ्यावी.**

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोटा केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (Govt. CAP) अथवा महाराष्ट्र विनाअनुदान अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन (Asso. CAP) यापैकी एकाच (CAP) मधून जागा भरता येतील. दोन्ही (CAP) मधून एकत्रित जागा भरता येणार नाहीत. ज्या विनाअनुदानित / कायम विना अनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमधून (CAP) अल्पसंख्यांक कोटा भरला आहे त्यांना Login ID

मधून प्रवेश पत्र काढून देणे आवश्यक राहील. तसेच अल्पसंख्यांक कोटयांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विना अनुदानित / कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने महाराष्ट्र विना अनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनमार्फत कोटा भरला असेल तर अल्पसंख्यांक कोटयांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी महाराष्ट्र विना अनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन तसेच प्रवेश नियंत्रण समितीकडून मान्य करुन घेणे अनिवार्य राहील. प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास शासनाच्या परवानगीने केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अध्यापक महाविद्यालयाला असोसिएशन सीईटी उत्तीर्ण व असोसिएशनच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची सीईटी उत्तीर्ण ज्यांना कोठेही प्रवेश मिळाला नाही असे उमेदवार घेता येतील.

अल्पसंख्यांक कोटयांतर्गत पुरेशा जागा संस्थेला उपलब्ध न झाल्यास अथवा संस्था अल्पसंख्यांक कोटा घेऊ इच्छित नसल्यास त्या जागा संस्थेला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे अल्पसंख्यांक आयोगाच्या परवानगीने समर्पित करता येतील.

एम.एड प्रवेश प्रक्रिया २०१५ ऑनलाईन महाविद्यालय नोंदणी पध्दत सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे नोदणी करावी.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०५१७२९ वर संपर्क साधावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत :

१. श्री.मोहन ठोंबरे, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. सन २०१५-१६ या वर्षी सुरु होणाऱ्या एम.एड. प्रवेश प्रक्रियेसंबंधीचे वरील प्रारुप वेबसाईटवर टाकण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. आपल्या विभागातील सर्व अध्यापक महाविद्यालयांना सदरच्या सूचना त्वरित वितरित करण्यात याव्यात.

३. सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांना माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीसाठी. आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व अध्यापक महाविद्यालयांना सदरच्या सूचना त्वरित वितरित करण्यात याव्यात.

# शासनाच्या केंद्रीय एम.एड (प्रथम वर्ष) प्रवेश प्रक्रियेत (२०१५-१६) सहभागी होण्यासाठी संबंधित अध्यापक महाविद्यालयाने भरुन द्यावयाचा तक्ता

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी. | महाविद्यालयाचे प्राचार्यांचे संपूर्ण नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | महाविद्यालयाची संपर्क व्यक्ती / संगणक तज्ञ व्यक्तिचा दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | संस्थेचा संपूर्ण नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक | संस्थेच्या संपर्क व्यक्तिचे नांव, पद, पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

| एन.सी.टी.ई. मान्यता आदेश क्रमांक व दिनांक | शासनाची परवानगी आदेश / ना हरकत प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | विद्यापीठ संलग्निकरण आदेश क्रमांक व दिनांक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ साठी (नसल्यास विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे खालील टिप २ प्रमाणे प्रमाणपत्र जोडावे) | वर्ष २०१५-१६ साठीचे संलग्निकरण नसल्यास यापूर्वी संलग्निकरण मिळालेले वर्ष व दिनांक | महाविद्यालय शासकीय (स्वयंसहाय्यित)/ अशासकीय अनुदानित / अशासकीय विना अनुदानित / कायम विना अनुदानित / विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग अनुदानित / विनाअनुदानित |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | |

| मुलांचे / मुलींचे / मुला-मुलींचे | प्रवेश क्षमता (माध्यम निहाय) | | अल्पसंख्यांक संस्था अल्पसंख्यांक अनुदानित ५० टक्के, विनाअनुदानित ५१ टक्के अंतर्गत भरत असलेल्या जागा | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून एकूण भरावयाच्या जागा |
|---|---|---|---|---|
| | युनिट | माध्यम | | |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | |

| शैक्षणिक शुल्क शासनाने / विद्यापीठाने / शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले | वसतीगृहाची सोय असल्यास प्रवेश क्षमता | वसतीगृहाची सोय असल्यास मुलांचे / मुलींचे / दोन्हीची | वसतीगृहात राहण्याचा मासिक / वार्षिक दर | वसतीगृह भोजनाचा मासिक / वार्षिक दर |
|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ |
| | | | | |

| विना अनुदानित साठी नांव नोंदणी शुल्काचे विवरण (डी.डी. काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचे नांव, डी.डी.नंबर व दिनांक रक्कम रु.१०००/-) (तुकडी निहाय शुल्क भरावे) | नॅकद्वारा मुल्यांकन झाले असल्यास दर्जा |
|---|---|
| २२ | २३ |
| | |

**टिप :** १. रकाना क्रमांक ७, ८, ९ व १० बाबत संबंधित आदेशांच्या प्रमाणित प्रती तसेच एनसीटीई अधिसूचना २०१४ प्रमाणे एनसीटीईला सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर कराव्यांत.

२."प्रमाणित करण्यांत येते की, ---------------------------------------------------- या अध्यापक महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ साठी संलग्नीकरण देण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन आहे. या महाविद्यालयात ------- युनिट असून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी महाविद्यालयाला युनिटसाठी एम.एड प्रथम वर्षाला विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी विद्यापीठाची शिफारस आहे." अशा आशयाचे विद्यापीठाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडावे.

प्राचार्यांची स्वाक्षरी